**संदर्भ:-** १) महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन परिपत्रक क्रमांक / संकिर्ण २०१७ / प्र .क्र. ४४ / आरोग्य ३ दिनांक ०४/०४/२०१९

दि:- १९/७/२०१९

जा.क्र.: मपानि/उप्रावा/१५५६

आदेश,

उपरोक्त संदर्भीय शासन निर्णयास अनुसरून , जैव वैदयकीय कचरा अधिनियम,२०१६ मधील नियम ११(११) नुसार अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव, राज्यस्तरीय सल्लागार समितीची स्थापना करण्यास संदर्भ क्रं. १ येथील शासन निर्णयानुसार मान्यता देण्यात आली होती. जैव वैदयकीय कचरा अधिनियम, २०१६ अंतर्गत नियमांची योग्यरित्या अंमलबजावणी केली जाते अथवा नाही यावर देखरेख ठेवणे, सदर अधिनियम अंतर्गत सल्ला देण्याचे तसेच सदर अधिनियमात सुधारणा झाल्यास त्याबाबत सल्ला देण्याचे काम राज्यस्तरीय सल्लागार समितीचे आहे. राज्यस्तरीय सल्लागार समितीप्रमाणेच जिल्हास्तरावर जिल्हास्तरीय सल्लागार समिती कामकाज पाहिल असे या शासन निर्णयामध्ये नमूद करण्यात आले आहे. त्यानुसार जिल्हास्तरावर जिल्हास्तरीय सल्लागार समिती स्थापन करणे आवश्यक असल्याने जैव वैदयकीय कचरा अधिनियम, २०१६ अंतर्गत नाशिक जिल्हास्तरावर कामकाज पाहण्यासाठी पुढीलप्रमाणे समिती स्थापन करण्यात येत आहे.

**समिती :-**

| | | |
|---|---|---|
| १. | जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २. | जिल्हा शल्यचिकित्सक | सदस्य |
| ३. | जिल्हा आरोग्य अधिकारी | सदस्य |
| ४. | उप आयुक्त, महानगरपालिका | सदस्य |
| ५. | मुख्य आरोग्य अधिकारी, महानगरपालिका | सदस्य सचिव |
| ६. | प्रादेशिक अधिकारी, जिल्हा प्रदूषण नियंत्रण मंडळ | सदस्य सचिव |
| ७. | इंडीयन मेडीकल असोसिएशन | प्रतिनिधी |

२. **सदर समितीची कार्यकक्षा पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेली आहे :**

१. जैव-वैदयकीय कचरा अधिनियम, २०१६ अंतर्गत नियमांची जिल्हास्तरावर योग्यरित्या अंमलबजावणी केली जाते अथवा नाही यावर देखरेख ठेवणे.

२. समितीची त्रैमासिक बैठक घेणे.

३. मुंबई नर्सिंग होम रजिस्ट्रेशन ॲक्ट १९४९ च्या अंमलबजावणीचा आढावा घेणे.

४. खाजगी व शासकीय रुग्णालयाचा जैविक वैदयकीय कचरा (**BMW**) नोंदणी बाबत आढावा घेणे.

५. रुग्णालयात किती जैविक वैदयकी कचरा निर्माण होतो व त्याची विल्हिवाट कशी लावली जाते याबाबत आढावा घेणे.

६. जैविक वैदयकीय कचरा विल्हेवाट लावण्यासाठी **Common Treatment and Disposal Facility** याचा आढावा घेणे.

७. जैविक वैदयकीय कचरा बाबत शासकीय व खाजगी रुग्णालयांच्या अडीअडचणी जाणून घेणे.

८. जैविक वैदयकीय कच-याच्या साठवणुक व विल्हेवाट यासाठी परिणामकारक उपाय योजनां बाबत उपाय सुचविणे व अंमलबजावणी करणे.

९. क्षेत्रिय भेटी देऊन पाहणी करणे.

१०. जैविक वैदयक कचरा बाबत इतर अनुषंगिक बाबींवर चर्चा व निर्णय घेणे.

**३. अहवाल सादर करणे :**

सदर परिपत्रकात नमुद करण्यात आले आहे की,समितीने आपला अहवाल सर्व संबंधितांना दरमहा सादर करावा.

उपरोक्त दर्शविल्या प्रमाणे सदर जैव वैदयकीय कचरा अधिनियम, २०१६ अंतर्गत नाशिक जिल्हास्तरावर जिल्हास्तरीय सल्लागार समिती या आदेशाच्या दिनांका पासून कार्यान्वित राहील. सदर समितीने आपला अहवाल सर्व संबंधितांना दरमहा सादर करावा.

जिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक

प्रत माहितीस्तव सादर.

१) मा. अपर मुख्य सचिव , महाराष्ट्र शासन, पर्यावरण विभाग, मंत्रालय, नवी प्रशासन भवन, १५ वा मजला, मादामकामा मार्ग मुंबई- ३२

२) मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सायन, मुंबई.

३) प्रधान वैज्ञानिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई.